# गार्डन बचावसाठी लहान मुले मैदानात





## ▪ झाडे जगविण्यासाठी मुलांची मोहीम ▪ मनपाने घ्यावा आदर्श

शिवाजी कदम
shivajiikadam@lokmat.com

**औरंगाबाद, दि.२६- मनपाच्या गार्डनची दुरवस्था झाल्याची ओरड नेहमीच होते. मनपाचे अधिकारीही गार्डनच्या सुशोभीकरणकडे लक्ष देत नसल्याने गार्डनमध्ये असणारी झाडे लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. एन-८ परिसरातील मनपाच्या बॉटनिकल गार्डनची दुरवस्था असून, मनपाचे अधिकारी मात्र याकडे लक्ष देत नसल्याने गार्डनमध्ये असणारी झाडे वाचविण्यासाठी लहान मुलांनीच पुढाकार घेतला असून इको नीडस् फाऊंडेशनच्या सहकार्याने झाडे बचाव अभियान सुरू केले आहे.**

दुर्मिळ जातीच्या झाडांचे संर्वधन करण्यासाठी मनपाच्या वतीने काही वर्षांपूर्वी एन-८ परिसरात

होण्याच्या मार्गावर आहेत. मनपा प्रशासनाकडे अनेक वेळा निवेदने देऊनही कोणतीच हालचाल होत नसल्याने

वाचविण्यासाठी झाडे बचाव अभियान सुरू करण्यात आले आहे. आज या अभियानाची सुरुवात करण्यात आली. गार्डनमधील मरणासन्न अवस्थेत असणाऱ्या झाडांना पाणी देऊन झाडे जगविण्याचा प्रयत्न मुलांकडून करण्यात येत आहे. यासाठी मुलांनी विशेष पथक तयार केले असून, प्रत्येक रविवारी विशेष उपक्रम राबवून गार्डनमधील प्रत्येक झाडाला जगविण्याची जिद्द मुलांनी दाखविली आहे. इको नीडस् फाऊंडेशनच्या सहकार्याने करण्यात येणाऱ्या उपक्रमात अनिरुद्ध जोहरे, राहुल इंगळे, अमोल भालेराव, अक्षय सुरासे, किरण पुणेकर, संकेत शिरोडे, सम्यक जमधडे, तेजस गायकवाड, रोहित थोरात, सुमित उबाळे, प्रणव कुसुलिंगेवार, आशिष डोंगरे, नीलेश दंडे आदींनी सहभाग नोंदविला. मनपाने सहकार्य केल्यास